**अभियांत्रिकी /औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या विद्यार्थ्यांसाठी ऊर्जा परीक्षण संयंत्राचे प्रदर्शन शिबीर**

महाऊर्जातर्फे दरवर्षी दि.१४ डिसेंबर हा “राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिवस” व दि.१४ ते २० डिसेंबर, हा “ऊर्जा संवर्धन आठवडा” राज्यात साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून महाऊर्जातर्फे जनसामान्यात ऊर्जा संवर्धनाविषयी जनजागृती करण्याच्यादृष्टीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

अभियांत्रिकी /औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्राची माहिती होणेसाठी तसेच ऊर्जा परीक्षणासाठी या संयंत्राचा वापर कशाप्रकारे केला जातो याची संक्षिप्त माहिती देण्यासाठी, महाऊर्जा मुख्यालयात ऊर्जा संवर्धन सप्ताहादरम्यान ऊर्जा परीक्षण संयंत्राचे प्रदर्शन शिबीर दि.१४ ते २० डिसेंबर, २०२१ दरम्यान शासनाच्या कोविड नियमांचे पालन करुन आयोजित करण्यात येत आहे.